राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीवर पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील तज्ञांची नेमणूक करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००४/प्रक्र-१४८/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक :-२० सप्टेंबर, २००४**

वाचा :- शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु-१००४/प्रक्र-४७/पापु-०७, दिनांक २ एप्रिल, २००४

**प्रस्तावना :-**

स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान या केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे राज्य स्तरावरील अपेक्षित संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, संनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षित कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी **"राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन"** गठीत करुन या मिशनमध्ये **"शिखर समिती"** व **"कार्यकारी समिती"** या दोन समित्यांची स्थापना संदर्भातील दिनांक२ एप्रिल, २००४ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. या मधील **"शिखर समिती"** वर पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील तीन तज्ञांची सदस्य म्हणून नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान या केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे राज्य स्तरावरील अपेक्षित संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, संनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षित कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या **"राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन"** च्या **"शिखर समिती"** वर पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील खालील संस्थांची/व्यक्तींची सदस्य म्हणून नेमणूक करण्यास शासन मान्यता देत आहे:-

१) युनिसेफचे प्रतिनिधी
२) वॉटर अँड सॅनिटेशन प्रोग्रॅम (साऊथ एशिया) (WSP-SA) या जागतिक बँकेच्या संस्थेचे प्रतिनिधी
३) श्री.पोपटराव बागुजी पवार, सरपंच, ग्राम पंचायत,हिवरेबाजार, ता.जि.अहमदनगर

२.  वरील (१) व (२) येथील प्रतिनिधींना शिखर समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठीचा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्याचा खर्च संबंधित संस्थांकडून देण्यात येईल, तर श्री.पोपटराव बागुजी पवार यांना हा खर्च शासकीय नियमानुसार देय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव
८. अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
९. राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीचे व कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
१०. कार्यक्रम अधिकारी, युनिसेफ, मुंबई.
११. वॉटर अँड सॅनिटेशन प्रोग्रॅम (साऊथ एशिया) (WSP-SA), नवी दिल्ली.
१२. श्री.पोपटराव बागुजी पवार, सरपंच, ग्रामपंचायत, हिवरेबाजार, ता.जि.अहमदनगर
१३. जिल्हा कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
१४. विभागीय आयुक्त (सर्व)
१५. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१६. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
१७. जिल्हाधिकारी (सर्व)
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१९. प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२०. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
२१. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
२२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२५. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग